दिनांक २५/०४/२०२०

# पोलीस आयुक्तालय

## अमरावती शहर.

## दैनिक गुन्हे अहवाल

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३१३/२०२० कलम ३७९ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | राहुल अनिलराव सावरकर वय २३ वर्ष धंदा – शेती रा. पार्डी ता.जि.अमरावती |
| घटनास्थळ | फिर्यादी चे घरासमोरील गोठा ग्राम पार्डी |
| घटना ता. वेळ | २४/०४/२०२० चे ०२:०० वा |
| दाखल ता. वेळ | २४/०४/२०२० चे ११:५८ वा |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फिर्यादी याने आपले जनावरे गोठयात बांधुन ठेवलेले असता कोणी तरी अज्ञात चोराने नमुद घटना ता वेळी व ठिकाणा वरून १. भुरक्या रंगाचा ३ वर्ष वयाचा एक गोरा कि.अं. १०,०००/– रू व २. एक पाढं–या रंगाची ४ वर्ष वयाची गाय कि.अं. १५,०००/– रू असे एकुण २५,०००/– रू चे जनावरे चोरून नेले अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेताल. |
| तपास अधिकारी नाव व मो. क्र. | मसपोनि कविता गुल्हाणे पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर. |

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३१४/२०२० कलम २९४,५०६ (ब) ३२३, ३४ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | २५ वर्षीय महिला |
| घटनास्थळ | ग्राम भानखेडा खुर्द ता.जि.अमरावती |
| घटना ता. वेळ | २०/०४/२०२० चे १२:०० वा |
| दाखल ता. वेळ | २४/०४/२०२० चे १४:२५ वा |
| आरोपी /चे नाव व पत्ता | १. रमेश काशीनाथ तांबे वय ३० वर्ष (पती) २. काशिनाथ रामा तांबे वय ५५ वर्ष (सासरे) ३. एक महिला, वय ४८ वष सर्व रा. ग्राम भानखेडा खुर्द ता.जि.अमरावती |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपी क्रमांक १, २, ३ हे फिर्यादी चे पती, सासरे, सासु आहेत आरोपी क्र. १ हा दारू पिण्याच्या सवयीचा आहे तो नेहमी घरगुती कारणा वरून फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण करतो. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हिने आरोपी क्र. १ यास म्हटले की तुम्ही दारू पिणे सोडुन ध्या या कारणा वरून आरोपी क्र. १ याने फिर्यादीस जेवणाचे ताट फिर्यादीच्या अंगावर फेकुन दिले त्या दरम्यान आरोपी क्र. २ व ३ हे तेथे आले व आरोपी क्र. १ याला म्हटले की अश्लिल शिवीगाळ करून मारहाण केली तु आमच्या घरून निघुन जा नाहीतर तुला जिवाने मारून टाकीन अशी तिघांनी धमकी दिली. अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेताल. |
| तपास अधिकारी नाव व मो. | मसपोनि कविता गुल्हाणे पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर. |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.४०३/२०२० कलम ३२४,५०४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला वय २१ वर्ष, धंदा-मजुरी , रा.वडरपुरा दर्गाजवळ अमरावती |
| घटनास्थळ | फि.चे राहते घरी वडरपुरा दर्गाजवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२३.०४.२०२० चे २१.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि.२४.०४.२०२० चे २२.११ वा |
| आरोपी | पंकज वासुदेव शेळके , रा.वडरपुरा दर्गाजवळ अमरावती |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादि व आरोपी हे पती पत्नी असुन फिर्यादि हि पाच महिन्याची गर्भवती आहे .यातील फिर्यादिचे पतीने (आरोपीने ) स्वयंपाक केला का असे फिर्यादिला विचारले असता फिर्यादि हिने सकाळचा केलेला स्वयंपाक तसाच आहे व गॅस सुध्दा संपलेला आहे असे म्हटले त्यामुळे े फिर्यादिचे पतीने फिर्यादिला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी डोक्यावर ,चेह-यावर ,गळयावर मारहान केली त्यामुळे फिर्यादिचे दोन्ही डोळे काळे झाले ेव गाल व गळयाला मार लागला .फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन तसेचे मेडिकल सर्टिफिके ेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घे ेतला . |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | म.पो.उप.नि.बळेगावे े पो.स्टे फ्रेजरपुरा अम. |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ३४०/२०२० कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | साहेबराव दादाराव तंतरपाळे वय ३५ वर्ष रा अशोक नगर अमरावती |
| घटनास्थळ | अशोक नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | २४.०४.२०२० चे १३.०० वा |
| दाखल ता. वेळ | २४.०४.२०२० चे १६.३५ वा |
| आरोपी | १.भाउराव रामराव मनोरे वय २५ वर्ष (२) रामराव देवराव मनोरे वय ५० वर्ष (३) सोनु मनोरे (४) साहेबराव मनोरे सर्व रा अशोक नगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन फिर्यादी हे त्यांचे घरासमोर उभे असतांना यातील आरोपी क्र ०१ हा बाहेर फिरत असतांना फिर्यादीने म्हटले की, तु बाहेर का फिरतो सध्या कोरोना आहे. असे म्हटले असता नमुद रागाने आरोपीतांनी फिर्यादी यांना लाठी काठीने, लाथा बुक्यांनी मारहाण करून फिर्यादीचे डोक्याला दुखापत केली व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधि. नाव व मो.नं. | पोउपनि गणेश अहिरे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | १५१/२० कलम ३२४,५०४,५०६ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | शेख इकबाल शेख बिस्मिल्ला वय-२८ वर्ष रा.रतनगंज गवळीपुरा मज्जीद मागे अमरावती |
| घटनास्थळ | रतनगंज गवळीपुरा मज्जीद मागे अमरावती |
| घटना. ता .वेळ | दिनांक २४/०४/२०२० चे १३.०० वा |
| दाखल .ता. वेळ | दिनांक २४/०४/२०२० चे १६.१० वा |
| आरोपी | शेख राजीक शेख रशीद रा. .रतनगंज गवळीपुरा मज्जीद मागे अमरावती |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी शेख इकबाल शेख बिस्मिल्ला वय-२८ वर्ष रा.रतनगंज गवळीपुरा मज्जीद मागे अमरावती याने पो.स्टेला दिनांक २४/०४/२० रोजी रिपोर्ट दिला की,त्याचे घराचे शेजारी राहनारा आरोपी शेख राजीक शेख रशीद रा. .रतनगंज गवळीपुरा मज्जीद मागे अमरावती याने फिर्यादी हा घराचे बाहेर उभा असता येवुन म्हटले कि,"तुमने मेरे खिलाफ नागपुरी गेट थाने मे जो रिपोर्ट दिया है, वह रिपोर्ट तु वापस लेले,अपुन कंपरमाईज कर लेगें"यावर फिर्यादीने नकार दिला याकारणावरुन आरोपीने शिवीगाळ करुन चाकुने फिर्यादीचे डावे हाताचे कोहनीवर,कंबर वर मारुन जख्मी केले व तोंडावर बुक्या मारल्या अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडिकल सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपास अधिकारी नाव व मोनं. | PSI पुरुषोत्तम ठाकरे पोस्टे नागपुरी गेट |
| वरिष्ठ पोलीस निरिक्षक | व.पो.नि अर्जुन ठोसरे सा. पोस्टे नागपुरी गेट |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | २८७/२०२० कलम ३०७,४५२,३९४,५०६(ब),३५२,३२३,३४भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | शैलेश हरिभाउ झिंगळे वय ३२ वर्ष रा. खारतळेगांव |
| आरोपी . | १)सिद्धार्थ अवचितराव चक्रे वय ३८ वर्ष रा.खारतळेगांव २)विनोद रामकृष्ण दुंदडे वय ३८ वर्ष रा. दर्यापुर दोन्ही |
| ०घटनास्थळ | ग्राम खारतळेगांव |
| घटना.ता.वेळ | २४/०४/२०२० चे २०/०० वा दरम्यान |
| दाखल ता.वेळ | २४/०४/२०२० चे २२/५४ वाजता |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | होय(आरोपी अटक आहे.) |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घटना ता वेळी व ठिकानी यातील फिर्यादी हा दवाखान्यात जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्रं.१ याने आपले ताब्यातील वाहन क्रं. एम.एच.२७ ये.आर.८४२५ ही जिवे मारणाऱ्या उद्देशाने त्याचे अंगावर नेली आरोपी क्रं. २ याने लोखंडी रॉड त्याचे अंगावर अगारुन जिवे मारण्याची धमकी दिली व यातील साक्षीदार डॉ.शेख यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करुन त्याच्या दवाखान्यातील पेशंटला लोखंडी रॉडने मारहान केली.व त्यांनी बाहेर उभे असलेले सतीश बनारसे यांना जिवे मारण्याची धमकी दिली अशा फि.चे जबानि रिपोर्ट वरुन व मेडी सर्टिवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | सपोउपनि चंदन सोनाजी मोरे ब.न.१०४१ पो स्टे वलगांव |
| पो.स्टे प्रभारी अधिकारी | पो.नी. श्री .आसाराम चोरमले सा. पो.स्टे वलगाव अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | २८६/२०२० कलम २९४,५०६(ब) भादवि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महिला वय २७ वर्ष रा.नया अकोला |
| आरोपी . | १)मंगेश सहदेव भोरे २)मनोज सहदेव भोरे दोन्ही रा.नया अकोला |
| ०घटनास्थळ | ग्राम नया अकोला |
| घटना.ता.वेळ | २४/०४/२०२०चे ०९/०० वा.दरम्यान |
| दाखल ता.वेळ | २४/०४/२०२० चे १२/२६ वाजता. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घठना ता वेळि व ठिकानी यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना तेव्हा फिर्यादीचे पती व दीर जेठ यांनी पो स्टे येथे नेले असता आरोपी क्रं. १ व २ हे फि.चे घरी कु-हाड घेउन आले व आरोपी क्रं. १ मंगेश सहदेव भोरे ने फिस म्हटले आज जिवाने मारतो अशी अश्लील भाषेत शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.आरोपी क्रं. २ मनोज सहदेव भोरे हा तेथे येवुन शिवीगाल करुन मारण्याची धमकी दिली. अशा जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ पाडुरंग दंडारे ब.न.६२५ पो स्टे वलगांव |
| पो.स्टे प्रभारी अधिकारी | पो.नी. श्री .आसाराम चोरमले सा. पो.स्टे वलगाव अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-८

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र २८७/२०२० कलम १८८ , २६९ भादवी सह कलम २,३,४ साथीचे रोग प्रतीबंधक अधिनियम १८९७ |
| फिर्यादि नाव व पत्ता | सर तर्फे पोहेका राजेश राठोड ब.नं.११८५ पोस्टे राजापेठ |
| घटनास्थळ | शंकर नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दी.२४/०४/२०२० चे ११/०० वा |
| दाखल ता. वेळ. | दी.२४/०४/२०२० चे १२/३७ वा |
| आरोपी | १.सोमेश रोशनराव लखानी वय २५ रा. बाबा हरदासराम सोसायटी कवरनगर अमरावती |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | समजपत्रावर रीहा |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी मा.जिल्हाधिकारी सा.अमरावती शहर यांचे कोराना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत बंद चा आदेश जारी असतांना मा. जिल्हाधीकारी सा अमरावती याचे आदेश क्र २७/कली/गृह विभाग/१४४ आदेश/कवि-२७१/२०२० दि,१४/०४/२०२० प्रमाणे आदेश निर्गमीत केले असतांना सुध्दा यातील आरोपी यांनी आदेशाचे उल्लघन करुन घराचे बाधकाम करतांना मीळुन आला सदर नमुद आरोपी ने आदेशाचे उल्लघंन केल्याने त्यांचे विरुध्द १८८ भादवी २६९ साथीचे रोग प्रतीबंधक अधिनियम १८९७ कलम २,३,४ प्रमाणे होत असल्याचे त्याच्यावर सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | पोहेका राजेश राठोड ब.नं.११८५ पोस्टे राजापेठ - |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-९

| | |
|---|---|
| पोलीसस्टेशन | पो.स्टे.भातकुली |
| अप क्र. व कलम | 85/2020 कलम 188, 269, 271 भादंवी. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सर तर्फे पो.हे.काँ.गजानन खुरक्टे ब.नं.762, पो.स्टे.भातकुली अमरावतीशहर. |
| घटनास्थळ | बस स्टॉप भातकुली. |
| घटना ता. वेळ | दि.24-04-20 रोजीचे 11/00 वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.24-04-20 रोजीचे13/15वाजता. |
| आरोपी | दिलीप जगदेवराव खल्लारकर वय 35 वर्ष रा. हरताळा |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | निरंक. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, मा.जिल्हाधिकारी साहेब, अमरावती यांचे कोराणा विषाणुचा प्रादर्भाव रोखण्याबाबत संचारबंदी आदेशक्र.कक्ष 27, कली, गृहविभाग 144 आदेश कावि-246-2020 दि.23-03-2020 नुसार अमरावती शहर व ग्रामीण भागात संचारबंदी असतांना आदेश जारी असतांना सदर आदेशानुसार पेट्रोलिंगकरीत असता बस स्टॅण्ड भातकुली येथे यातील नमुद. घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी हा ऑटो क्रमांक एम.एच.27 बीडब्ल्यु 1740 घेवुन फिरत असतांना मिळुन आला त्यास फिरण्याचे कारण विचारले असता समाधानकारक उत्तर दिले नाही. सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे तसेच जिवीतास धोकादायक असलेल्या रोगाचा संपर्क असलेली हयगयीक कृती करतांना मिळुन आल्याने त्यांचे विरुध्द कलम 188,269,271 भादंवी अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | पो.हे.काँ.गजानन खुरक्टे ब.नं.762,पो.स्टे.भातकुली अमरावती शहर. |
| वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.वाकसेसाहेब, पो.स्टे.भातकुली अमराव मो.नं. |

## भाग -६ गुन्हे बाबत- १

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.४०२/२०२० कलम २७९,४२७ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | किशोर वामनराव राउत वय ४८ वर्ष व्यवसाय - पेट्रोलिंग सुपरवायजर ,रा.अमर कॉलनि अमरावती |
| घटनास्थळ | मंगलधाम कॉलनि जवळ न्यु बायपास रोड अमरावती . |
| घटना ता. वेळ | दि.२१.०४.२०२० चे सकाळी ०६.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि.२४.०४.२०२० चे २१.२९ वा |
| आरोपी | सचिन आप्पासाहेब मिसाळ वय २७ वर्ष रा.ग्राम दागाचिवाडी अमळनेर ता.पाटोदा जि.बिड. |
| आरोपी अटक आहे किंवा नाही | नोटिसवर रिहा |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील गाडी क्र.एम.एच.४३ - यु-९४८८ च्या चालकाने आपले ताब्यातील टाटा कंपनिचा ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपनाने चालविल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले त्यामुळे कंपनिचे रस्त्यावर लावलेले सुरक्षा जाळी ,ब्लिंकर ( मेटल बिंम्ब क्रँश बँरिअर ,साईन बोर्ड ,हाय मास ,लो मास ,हजार मार्कर बोर्ड ,ऐटि,एम.एस.कथबुक ) यांचे मोठ्या प्रमानात नुकसान झालेले आहे .त्याची किंमत अंदाजे १,०२,००० /- रु. तसेचे सदर वाहनाचे देखिल नुकसान झालेले आहे अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन व डि.ओ.सा.यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव व मो. नं. | म.पो.उप.नि.बळेगावे पो.स्टे फ्रेजरपुरा अम. |
| पो.नि. नाव व मो.नं. | पो नी पुंडलिक मेश्राम पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

**जुगार रेड -निरक**
**प्रोव्हीशन रेड-निरंक**
**अकस्मात मृत्यु-निरंक**